# रवि - भाग १



गांधीवधानंतर लगेचच एके दिवशी पोलिस रविच्या शोधात आले. कुणीतरी त्यांना माहिती पुरवली की रवींची RSS (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) शी जवळीक आहे. एवढंच कशाला तर ऑफिसमधील त्यांच्या टेबलावरील काचेखाली RSS अशी आद्याक्षरे देखील आहेत. जेव्हा पोलिसांच्या लक्षात आले की त्यांच्या रवि शंकर शर्मा ह्या पूर्ण नावाची ही आद्याक्षरे आहेत, तेव्हा हा सारा मामला अत्यंत गंमतीने उलगडला गेला.

संगीत दिग्दर्शक रवि ही एक अशी व्यक्ती होती की ते आपले नाव फक्त आपल्या कचेरीतील टेबलावरच प्रदर्शित करीत. कुठल्याही मध्यस्थाने किंवा प्रसिध्दी माध्यमाने त्यांच्या कलागुणांची भलावण केली नाही. त्यांच्या ऐन उमेदीच्या काळातही त्यांनी आपल्याला कामे मिळावीत म्हणून किंवा आपल्या कर्तृत्वाची बढाई मारण्यासाठी एखाद्या कॉकटेल पार्टीचे आयोजन केले नाही. एखाद्या मुलाखतीत देखील त्यांच्या मृदू स्वभावाचे दर्शन होई. गंमत म्हणजे ते जे काही सांगत ते बहुधा ना त्या मुलखतकाराच्या कानापर्यंत पोचे ना अति संवेदनशील अशा टेपरेकॉर्डरवर उमटे !

परंतु रेकॉर्डिंग रुममध्ये मात्र त्यांचा कान नक्कीच तीक्ष्ण असे. आणि म्हणूनच अगदी लहान सहान तपशीलाकडेही बारकाईने लक्ष दिल्यामुळे ते अतिशय उत्कृष्ट संगीत देऊ शकले.

ते अतिशय नेमस्त संगीतकार होते. काही दशके नियमितपणे/सातत्याने त्यांनी केलेल्या स्वरयोजनांची संख्या आणि गुणवत्ता यांचे प्रमाण मानवी मनाला थक्क करणारे आहे. परंतु जेव्हा काही लोक दिग्गज संगीतकारांचा विचार करतात तेव्हा ते या यादीत अव्वल श्रेणीच्या स्थानापर्यंत रविचे नाव फिरकू देत नाहीत. उदाहरणच द्यायचे झाले तर समजा एखाद्या मैदानी खेळाच्या बाबतीत आपण जो जिंकून प्रथम आला त्याचं नाव लक्षात ठेवतो, पण थोड्या-फार फरकाने जो दुसरा आला त्याचे नाव मात्र विसरतो. अगदी पहिल्या क्रमांकाचा खेळाडू बदलत राहिला आणि दुसर्‍या क्रमांकाचा खेळाडू कायम राहिला तरीही. अशा स्थितीतही काही फरक पडत नाही. बर्‍याच संगीत

नियोजनाच्या बाबतीत रवीचेही काहीसे असेच झाले. बऱ्याच वेळा त्यांचा क्रमांक दुसराच राहिला.

कदाचित त्यांचे संगीत इतर संगीतकारांप्रमाणे एका विशिष्ट साच्यात बसणारे किंवा पटकन ओळखता येणारे असे नसल्यामुळेही असे झाले असावे. त्यांची बरीच गाणी लोकांना फारच आवडली, पण संगीत-दिगदर्शक कोण हे त्यांच्या विस्मरणात गेले. फक्त रविंच्याच बाबतीत असे घडले असावे. अर्थातच काही वेळा त्यांनी जिंकूनही दाखवले. त्यांचे काही संगीत तेव्हाही आणि आत्ताही लोकांना विलक्षण अप्रतिम असेच वाटले. 'चौदहवी का चाँद', 'दो बदन', 'घुँघट', 'वक्त', 'गुमराह' आणि आणखी बऱ्याच चित्रपटांना त्यांनी अतिशय उच्च श्रेणीचे संगीत दिले.

प्रथम काही वर्षे रवि यांनी हेमंतकुमार यांचे सहाय्यक म्हणून काम केले आणि नंतर 'वचन' (१९५५) या चित्रपटापासून स्वतंत्रपणे काम करण्यास सुरुवात केली.

रवि यांची मुलाखत:-

ती पावसाळी सकाळ होती आणि अशा दिग्गज संगीतकाराबरोबर गरम कॉफी घेणे ही एक अफलातून कल्पना होती ! ते भाता उघडून हार्मोनियमसमोर बसले होते. जणू मुलाखतीसोबत ते गाणंही म्हणणार होते !

प्रश्न - रवि साहेब, कृपया तुम्ही आम्हाला तुमची जन्मतारीख आणि जन्मगाव सांगाल का ? तुमचे बालपण कुठे गेले आणि संगीताची स्फूर्ती तुम्हाला कशी मिळाली ?

रवि - दि. ३ मार्च १९२६ रोजी दिल्ली येथे माझा जन्म झाला. आमच्या घरात कुणालाही संगीताची आवड नव्हती, परंतु मला मात्र होती. आर. सी. बोराल, पंकज मलिक आणि सैगल यांची गाणी ऐकणे अति आनंददायी होते. मी शाळेत बाकावर तबल्याचा ताल धरून आणि घरी तसेच मित्रांसोबतही गाणी म्हणत असे. सोहराब मोदी यांच्या 'पुकार' चित्रपटात 'तुम बिन मोरी कौन खबर ले' असे एक सुंदर भजन होते. मी ते वारंवार म्हणत असे. एके दिवशी माझे वडील मला बुधवारच्या भजन महफिलीत घेऊन गेले आणि मी तिकडे 'तुम बिन मोरी कौन खबर ले' हे भजन म्हटले. सगळ्यांना ते खूपच आवडले. त्यामुळे मला खूपच प्रोत्साहन मिळाले. ह्या भजनमेळ्यात एक मुलगा होता. तो माझ्या गाण्यासोबत हार्मोनियम वाजवायचा. तो गाणे पण म्हणायचा. त्यामुळे माझे एवढे कौतुक झालेले त्याला आवडले नाही. नंतरच्या वेळी त्याने हार्मोनियम वरच्या पट्टीत वाजवली. त्यामुळे अर्थातच गाणे खराब झाले. त्या पट्टीवर माझा आवाज फाटला. वडिलांनी माझी खरडपट्टी काढली. काय झाले काय तुझ्या आवाजाला असे ते दरडावून म्हणाले. तू अरबट चरबट काहीही खातोस त्यामुळे असे झाले

असेही ते पुढे म्हणाले. मला माझ्या आवाजाला काय झाले ते नक्की कळले आणि मी वडिलांना म्हणालो मला एक हार्मोनियम घेऊन द्या. त्यांनी ती दिलीच आणि शिवाय त्यांनी आपल्या मित्राला मला हार्मोनियम शिकविण्याची विनंतीही केली. मी सतत ५-६ आठवडे हार्मोनियम वाजवण्याचा सराव करीत होतो. सतत तेच भजन ! नंतर एका बुधवारी मी पुन्हा त्या भजनी मेळ्यात गेलो. अर्थातच त्या हार्मोनियम वाजविणाऱ्या मुलाखेरीज बाकी सर्वजण एकदम खूष झाले. मला ५ वेळा प्रसाद देऊन त्यांनी आपली खुषी दर्शविली. त्यानंतर बऱ्याच पार्ट्यांना मी गाणे म्हणू लागलो आणि त्या परिसरात प्रसिध्द झालो.

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com